# वर्ग १ ते ९ चा निकाल १००% अथवा १० वीचा निकाल १००%

शाळेची जाहिरात पेपरमध्ये दिली आणि एक प्रश्न पुढे आला. वर्ग १ ते ९ चा निकाल १००% यात विशेष ते काय ? शाळाच तर परीक्षा घेते व निकाल लावते.

पण जेव्हा वर्ग १ ते ९ चा निकाल १००% देतो तेव्हा खरं म्हणजे आम्ही कच्च्या राहिलेल्या मुलांवर अपार मेहनत घेतो तेंव्हा कुठे दहावीचा निकाल १००% लागतो. नाहीतर फक्त एकच गोष्ट शक्य होती, एकतर वर्ग १ ते ९ निकाल १००% किंवा फक्त १० वी चा निकाल १००%

आम्हाल प्रत्येक वर्गात जबरदस्त फिल्टर लावत लावत दहावीचा निकाल १००% देता आला असता, पण काही कारणास्तव कच्च्या राहिलेल्या विद्यार्थांवर आम्ही जेव्हा मेहनत घेतली तेव्हांच दोन्ही गोष्टी शक्य झाल्या. जर विद्यार्थी १० वीत पोहोचेपर्यंत खालच्या वर्गांमध्येच विद्यार्थ्यांना नापास करत चाळणी लावती असती आणि मग १० वीत १००% निकाल दिला असता तर शाळा चालवायचा मला अधिकारच काय होता ? शाळा सुरू करतानाच मी ठरवलं होतं, अगदी हरलेल्या पालकांना मी दिलासा देईन कारण या मुलांचा काहीच दोष नसताना त्यांच्या माथी अपयशाचा ठप्पा बसला आहे व तो दूर करणं सहज शक्य आहे, फक्त त्याला हवी सकारात्मकता व त्या दृष्टीने केलेली वाटचाल!

आणि एक स्पष्ट करावसं वाटत की आम्ही वर्ग १ ते१० चा निकाल १००% देतो तो सुद्धा विद्यार्थांना प्रवेश देताना कुठलीही परीक्षा किंवा मुलाखत (पालकांची व विद्यार्थांची) न घेता!

या विद्यार्थांवर मेहनत घेता घेता मग एक दिवस असा उजाडतो की आम्हालाच प्रश्न पडतो , अरे ! हा विद्यार्थी तर किती छान अभ्यास करतोय व त्याच्या मार्कांमध्ये पण किती वाढ दिसतेय , मग का बर या विद्यार्थांला कच्चा ढ म्हंटल गेल ? पण या साठी आम्हाला मदत घ्यावी लागती ती "ध्यानाची" सर्वांना

प्रश्न पडतो, हे ध्यान काय आहे ? तेव्हा त्यांना सांगाव लागतं–ध्यान म्हणजे Mediation तेंव्हा पालक नाराजीने का होईना माना डोलावतात. कारण आजकाल Mediation बद्दल चांगल बोलल्या जातं. पण पालकांना मात्र मनापासून ध्यानाचे फायदे पटत नाहीत. तरिही आमच्या शाळेतील सर्व विद्यार्थी जे १/२ तास ध्यान करतात तेंव्हा कुठे त्यांच्यातील चंचलता कमी होऊन अभ्यासात लागणारी एकाग्रता त्यांना साधता येते. त्यासाठी दरवर्षी आम्ही विद्यार्थ्यांना ध्यान शिबिरासाठी घेऊन जातो.

त्यानंतर सर्वांत महत्वाची असते ती गती. प्रत्येक विद्यार्थ्यांची गती वेगवेगळी असते. आम्हाला त्या विद्यार्थ्यांच्या गतीप्रमाणे छोटे छोटे उद्दिष्ट ठरवावे लागतात. व जसजसे ह्या विद्यार्थ्यांना यायला लागतं. मार्क मिळायला लागतात, तेंव्हा कुठे विद्यार्थ्यांच्या डोळयातून दिसते आनंदाची झलक व आत्मविश्वासाची छटा आणि शाळा चालवण्याचं सार्थक झाल्यासरख वाटंत. व हे सर्व साध्य झाल ते हायर इंग्रजी मधुन, म्हणून विशेष आनंद. प्रत्येक विद्यार्थ्यांला हिंदी, इंग्लीश व मराठी या तिन्ही भाषांवर प्रभुत्व असणं हा एक व्यक्तिमत्वाचा आवश्यक भाग ठरतोय. या सर्व भाषांवर खूप भर दिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलन शक्तीची ही वाढ झालेली दिसते. हळूहळू हे सर्व मागे पडलेले विद्यार्थी मुख्य वर्गात समावून जातात आणि उत्तम कामगिरी करतांना दिसतात. कारण ह्या विद्यार्थ्यांमध्ये इंटेलिजन्स होताच नव्हती ती दिशा ती फक्त आम्ही दिली म्हणूनच फक्त १०वी चा निकाल १००% लागतो हे न सांगता वर्ग १ ते १० चा निकाल १००% लागतो असे आम्ही ठामपणे सांगू शकतो.

२४ मे २००८